




दैनिक **अचूक वेध, अचूक बातमी**

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०६ | अंक : ५३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०६ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## पुण्यात एमपीएससी विद्यार्थी आंदोलन की राजकीय आखाडा?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, पुणे :** पुण्यातील सदाशिव पेठ, नवी पेठ आणि शनिवार पेठेतील अभ्यासिकांमधून निर्माण झालेला स्पर्धा परीक्षार्थ्यांचा असंतोष सध्या रस्त्यांवर उफाळून आला आहे. चझडउ च्या परीक्षांमधील कथित गैरव्यवहार, औषध निरीक्षक परीक्षेतील पेपरफुटी, रखडलेल्या भरती प्रक्रिया आणि परीक्षा पद्धतीतील वारंवार होणाऱ्या बदलांमुळे लाखो तरुणांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

मात्र, सुरुवातीला हक्काच्या मागण्यांसाठी सुरू झालेल्या या आंदोलनाला अवघ्या काही दिवसांत उघड राजकीय वळण मिळाले असून, विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचे रूपांतर आता सत्ताधारी आणि विरोधकांच्या राजकीय आखाड्यात झाले आहे. एकाच शहरात, एकाच लोकसेवा आयोगाच्या कारभाराविरोधात अवघ्या दोन किलोमीटरच्या परिघात तीन वेगवेगळ्या ठिकाणी तीन स्वतंत्र आंदोलने उभी राहिली आहेत. विद्यार्थी हिताचा बुरखा पांघरून राजकीय पक्ष आपापले शक्तिप्रदर्शन करत असल्याने हा लढा आता विद्यार्थ्यांच्या मागण्यांपेक्षा राजकीय कुरघोडीभोवतीच अधिक फिरताना दिसत आहे.

पुण्यात एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे कोणतेही एकसंध आंदोलन सुरू नसून, परीक्षा पद्धतीच्या वादावरून आंदोलनात उभी फूट पडली आहे. एका बाजूला वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीचा आग्रह धरणारे गट आहेत, तर दुसऱ्या बाजूला २०२५ पासून लागू झालेली वर्णनात्मक पद्धतच कायम राहावी म्हणून ठाम असणारा गट रस्त्यावर उतरला आहे. तर तिसरं आंदोलन आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासाठी सुरु आहे. या तात्विक आणि प्रशासकीय मतभेदांचा फायदा राजकीय धुरिणांनी घेतल्याने आंदोलनाचे तीन स्वतंत्र तंबू ठोकले गेले आहेत.



टिळक चौकात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी घेतलेली भूमिका या संघर्षातील अंतर्गत धुसफूस स्पष्ट करणारी ठरली आहे. आम्ही गेल्या तीन वर्षांपासून वर्णनात्मक पद्धतीचा अभ्यास करत आहोत, आम्ही काय प्रयोगशाळेतील उंदीर आहोत का? जर रस्त्यावरील गर्दीच्या आणि राजकीय दबावावरूनच अभ्यासक्रम ठरणार असेल तर आयोगाने थेट चिठ्ठ्या टाकूनच अधिकारी निवडावेत, असा संतप्त सवाल या गटाने उपस्थित केला आहे. एकाच परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे ३ परस्परविरोधी गट आमनेसामने उभे ठाकल्याने प्रशासनासमोर मोठा पेच निर्माण झाला असून, आंदोलनाची एकजूट पूर्णपणे विस्कळीत झाली आहे.

**विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक: राजकीय अजेंडा कसा चालवला जातोय?**

पुण्यातील आंदोलनाचा प्रवास तपासला असता, विद्यार्थ्यांच्या अस्सल प्रश्नांना राजकीय रंग कसा चढवला गेला याची स्पष्ट साखळी उलगडते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पर्धा परीक्षा समन्वय समिती आणि विद्यार्थी प्रतिनिधींच्या शिष्टमंडळासोबत सह्याद्री अतिथीगृहावर तब्बल पावणेतीन तास प्रदीर्घ बैठक घेतली होती. या बैठकीत शासनाने विद्यार्थ्यांच्या बहुतांश मागण्यांवर निर्णय जाहीर केले. पेपरफुटी प्रकरणाची आयोगाचे अध्यक्ष आणि सचिवांसह तीन महिन्यांत न्यायालयीन चौकशी करण्याचे आश्वासन देण्यात आले, वादग्रस्त सचिव महेंद्र हरपाळकर यांची तडकाफडकी बदली करण्यात आली, आगामी तीन वर्षांचे भरती वेळापत्रक महिनाभरात जाहीर करून सुमारे ७० हजार जागा भरण्याचे जाहीर झाले आणि सर्व परीक्षा ऑफलाइन घेण्यासह एकल ओळखपत्र (सिंगल कार्ड) प्रणाली मान्य करण्यात आली.

या निर्णयानंतर शिष्टमंडळाने समाधान व्यक्त करत २ ऑक्टोबरचे प्रस्तावित आंदोलन मागे घेण्याचे लेखी निवेदन दिले होते. मात्र, हे शिष्टमंडळ पुण्यात दाखल होताच आंदोलनाला अनपेक्षित कलाटणी मिळाली. आमदार रोहित पवार यांनी गांजवे चौकात ठिय्या मांडत एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याचा मुद्दा लावून धरला आणि उपोषण सुरू केले. यातून विद्यार्थ्यांमध्येच संशयाचे वातावरण तयार झाले. एका गटाने आरोप केला की शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांच्या दबावाखाली माघार घेतली होती, तर दुसऱ्या गटाचा दावा असा होता की विरोधी पक्षातील नेत्यांच्या सांगण्यावरून हे आंदोलन जाणीवपूर्वक जिवंत ठेवले जात आहे.

महाविकास आघाडीने या आंदोलनाला राज्यव्यापी युवा असंतोषाचे रूप देण्याची रणनीती आखल्याचे स्पष्टपणे दिसून येते. खासदार सुप्रिया सुळे यांनी आंदोलनस्थळी हजेरी लावत विद्यार्थ्यांच्या समस्यांचा संबंध थेट शेतकरी आत्महत्या, कर्जमाफी आणि पेपरफुटीशी जोडला. आंदोलनस्थळावरील पोलिसांच्या निगराणी व्हॅनवर बोट ठेवत त्यांनी यामागे अदृश्य शक्तीचा हात आहे असा राजकीय आरोप केला. तिकडे काँग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी यांनी दिल्लीतून ट्विट करत या आंदोलनाला 'सत्याग्रह' संबोधले आणि युवक काँग्रेस तसेच एनएसयूआयच्या कार्यकर्त्यांना विद्यार्थ्यांच्या खांद्याला खांदा लावून मैदानात उतरण्याचे आदेश दिले. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी स्वतः मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी फोनवरून संवाद साधत मध्यस्थीची तयारी दर्शवली, ज्यामुळे या आंदोलनाचे राजकीय वजन आणखी वाढले.

## महावितरणच्या हलगर्जीपणामुळे बैलाचा मृत्यू !
### शेतकऱ्यासमोर शेतीचा प्रश्न ?



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, कढोली बुं (चंद्रपूर) :** महाराष्ट्रात दुष्काळसदृश परिस्थिती असताना मौजा कढोली बु. येथे २ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० वाजता शेतातील विद्युत तारेचा बैलाला धक्का लागून त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे शेतकरी चरणदास संभाजी काळे यांच्यासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

चरणदास काळे हे शेतामध्ये फवारणी करण्यासाठी बैलगाडीने पाण्याचा ड्रम घेऊन जात असताना शेतातील विद्युत खांबाजवळील विद्युत तारेचा बैलाला स्पर्श झाला. विजेचा धक्का बसल्याने बैलाचा जागीच मृत्यू झाला. यावेळी चरणदास काळे यांनाही विजेचा धक्का बसला; मात्र त्यांनी बैलगाडीवरून उडी मारल्याने त्यांचा जीव थोडक्यात बचावला.

या घटनेबाबत राजुरा पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविण्यात आली आहे. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. कार्तिक कामटे यांनी मृत बैलाचे शवविच्छेदन केले असून, विद्युत तारेचा धक्का लागून बैलाचा मृत्यू झाल्याचे प्राथमिकदृष्ट्या सांगण्यात आले.

**एका बैलाने शेती कशी करायची?**

बैल हा शेतकऱ्याच्या शेतीचा महत्त्वाचा आधार आहे. त्यातील एक बैल अचानक मृत्युमुखी पडल्याने आता उरलेल्या एका बैलाच्या साहाय्याने शेतीची कामे कशी करायची, असा प्रश्न चरणदास काळे यांच्यासमोर उभा राहिला आहे. दुष्काळसदृश परिस्थिती, शेतीतील वाढता खर्च आणि त्यातच बैलाचा मृत्यू यामुळे शेतकऱ्यावर आर्थिक संकट ओढवले आहे.

या घटनेला संबंधित विद्युत यंत्रणेतील हलगर्जीपणा कारणीभूत असल्याचा आरोप शेतकऱ्याकडून करण्यात येत असून, महावितरण कंपनीने घटनेची तातडीने चौकशी करून शेतकऱ्याला आर्थिक मदत व नियमानुसार नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी चरणदास संभाजी काळे यांनी केली आहे

तसेच शेतातील धोकादायक विद्युत तारा व खांबांची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, जेणेकरून भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटना घडणार नाहीत, अशी मागणीही शेतकऱ्यांकडून होत आहे.

## तुळजापूरला निघालेल्या पालखीचे टाकळी ढोकेश्वर येथे जल्लोषात स्वागत

शारदीय नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्राची कुलस्वामिनी आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान नगरची माहेरवाशीण असलेल्या तुळजाभवानी मातेच्या पालखीचे तुळजापूर येथील सीमोल्लंघन सोहळ्यासाठी आज वाजत गाजत भंडाऱ्याची उधळण करत टाकळी ढोकेश्वर गावातून तुळजापूरकडे प्रस्थान झाले. भाविकांच्या मनातील इच्छा आणि आकांक्षा पूर्ण करण्याची सामर्थ्य देवीमध्ये आहे नवसाला पावणारी ही माता प्रत्येकाच्या जीवनात सुख, समृद्धी आणि आनंदाचे सुवर्णक्षण घेऊन येते. आजचा सोहळा भक्ती, श्रध्दा आणि एकतेचे प्रतीक आहे.

**– रविंद्र भगत, पालखीचे मुख्य मानकरी**



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, पारनेर (अहिल्यानगर) :** शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त नगरहून श्रीक्षेत्र तुळजापूरला जाणाऱ्या मानाच्या तुळजाभवानी देवीच्या पालखी दाखल होताच ग्रामस्थांनी उत्साहात स्वागत केले. संबळाच्या कडकडाटात आई राजा उदो -उदोच्या गजरात हळद कुंकू आणि फुलांची उधळण करत पालखी गावात प्रवेशली.

टाकळी ढोकेश्वर येथील हनुमान मंदिरात देवीची पालखी दर्शनासाठी ठेवण्यात आली होती,यावेळी पालखीचे पारंपरिक पद्धतीने टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांकडून पालखीचे उत्साहात भक्तिभावाने स्वागत व पूजन करण्यात आले. यावेळी पालखीचे वंशपरंपरागत मानकरी भगत यांनी साडीचोळी, पुष्पहार अर्पण करून ग्रामस्थांच्या हस्ते पालखीची विधिवत पूजा व आरती केली. आज सोमवारी (दि.५) सप्टेंबर रोजी सकाळी ग्रामस्थांच्या हस्ते सामुदायिक महाआरती करण्यात आली. यावेळी दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी 'आईराजा उदो उदो, सदानंदाचा उदो उदो..., बोल तुळजाभवानी माता की जय...' असा जयघोष केला. दिवसभर गावातील सर्व जाती धर्माचे नागरिक या पालखी सोहळ्यात सहभागी होऊन मातेची खणा - नारळाने ओटी भरून औक्षण करून,दर्शन घेतले. देवीच्या पालखी यात्रोत्सव यानिमित्ताने मोठी गर्दी झाली होती. सायंकाळी पालखीचे दर्शन झाल्यावर महाआरती होऊन वाजतगाजत पालखीची गावातून मिरवणूक काढण्यात आली. टाकळी ढोकेश्वर गावातील मुख्य चौकात पालखीचे स्वागत करण्यासाठी भंडाऱ्याची उधळण करत पालखी भाविकांच्या खांद्यावर खेळवण्यात आली. या धार्मिक कार्यक्रमास जेष्ठ नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अन्नामोड येथील अनधिकृत देशी दारू दुकानाचा मुद्दा तापला
### राज्य उत्पादन शुल्क जिल्हा अधीक्षकांनी केली पाहणी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** खापरखेडा येथील अन्नामोड परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवर मागील अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या अनधिकृत देशी दारू दुकानाचा मुद्दा आता चांगलाच तापला आहे. देशी दारू दुकान विरोधात व इतर मागण्यासाठी विरोधात माजी उपसभापती राहुल तिवारी यांनी २ ऑक्टोबरपासून बेमुदत आंदोलन सुरू केल्याने प्रशासकीय पातळीवर मोठी खळबळ उडाली आहे.

५ ऑक्टोबर सोमवारला दुपारच्या सुमारास राज्य उत्पादन शुल्क विभागाचे नागपूर ग्रामीण जिल्हा अधीक्षक वैभव वैद्य यांनी अनधिकृत देशी दारूचे दुकान गाठत प्रत्यक्ष पाहणी केली. दरम्यान तहसील कार्यालयाच्या पथकाने संबंधित जागेचा पंचनामा केला. आंदोलनाच्या चौथ्या दिवशी सोमवारला सायंकाळच्या सुमारास तहसीलदार अक्षय पोयाम यांनी स्वतः आंदोलनस्थळी भेट दिली. यावेळी राहुल तिवारी यांच्याशी चर्चा करून त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या, शिवाय अनधिकृत देशी दारूच्या दुकानाच्या जागेची पाहणी केली. या जागेचा सविस्तर पंचनामा तयार करून तो पुढील कारवाईसाठी जिल्हाधिकारी तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे पाठविण्यात आला असल्याची माहिती तहसीलदार पोयाम यांनी दिली.

उपसभापती राहुल तिवारी यांच्या मागण्या संदर्भात खापरखेडा औष्णिक वीज केंद्र व वेकोली प्रशासना सोबत चर्चा करून मार्ग काढण्याचे आश्वासन यावेळी तहसीलदार पोयाम यांनी दिले.

प्रशासनाने अद्याप या दुकानावर कायमस्वरूपी कारवाईचा ठोस निर्णय घेतलेला नाही, उलट संबंधित देशी दारूचे दुकान इतर ठिकाणी स्थलांतरित करण्याच्या हालचाली सुरू असल्याच्या सूचना उत्पादन शुल्क विभागाकडून देण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

## केंद्राच्या रेल्वे स्थायी समितीवर खासदार नरेश म्हस्के यांची नियुक्ती

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, ठाणे :** केंद्र शासनाच्या महत्त्वाच्या रेल्वे विषयक स्थायी समितीवर खासदार नरेश म्हस्के यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समितीच्या माध्यमातून रेल्वे विभागाच्या ध्येय-धोरणांवर, कामकाजावर, अर्थसंकल्पावर तसेच विकासाशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करून आवश्यक सूचना व निर्णय प्रक्रियेत योगदान दिले जाते. समितीचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ खासदार सुधीर गुप्ता काम पाहणार आहेत.




या नियुक्तीबद्दल खासदार नरेश म्हस्के यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, शिवसेना पक्षाचे मुख्य नेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि लोकसभा गटनेते डॉ. श्रीकांत शिंदे यांचे आभार मानले.

यापूर्वी म्हस्के यांनी नगरविकास आणि गृहनिर्माण समितीवर काम केले आहे. तसेच वक्फ सुधारणा विधेयक, कंपनी कायदा सुधारणा विधेयक आणि परदेशी देणगी सुधारणा यांसंदर्भातील संयुक्त संसदीय समिती, दळणवळण मंत्रालयातील हिंदी भाषा समिती तसेच रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या नेतृत्वाखालील रेल्वे सल्लागार समितीवरही त्यांची नियुक्ती झाली आहे.

रेल्वे स्थायी समितीच्या माध्यमातून मुंबई, ठाणे, कल्याणसह संपूर्ण महाराष्ट्रातील रेल्वेशी संबंधित प्रश्न आणि विकासकामे प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळणार असल्याचे म्हस्के यांनी सांगितले. वाढती लोकसंख्या व प्रवासी संख्या, रेल्वेवरील वाढता ताण, उपनगरीय रेल्वे सुविधा, नवीन प्रकल्प, स्थानकांचा विकास आणि प्रलंबित प्रश्नांना प्राधान्याने मांडण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मिळालेल्या या जबाबदारीचा उपयोग केवळ मुंबई आणि ठाण्यासाठी नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या रेल्वे विकासासाठी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न राहील, असे खासदार म्हस्के यांनी सांगितले.

अक्षराज






## 'एआय'चा धाक की कावा?

कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स – एआय) ही संज्ञा सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग होऊ लागली, त्याला आता चार वर्षे उलटत आहेत. कोणतेही नवे तंत्रज्ञान त्यासोबत जे अधिक–उणे घेऊन येते; तशीच एआयचीही चर्चा सुरू आहे. अँथ्रॉपिक या जगातील आघाडीच्या अमेरिकी एआय कंपनीत संशोधक म्हणून काम करणाऱ्या जेकब कॉक्सन या तरुणाने ती कंपनी सोडताना थेट या तंत्रज्ञानविकासातून मानवी अस्तित्वच धोक्यात येणार असल्याचा इशारा दिला. पाठोपाठ या क्षेत्रातील जाणकारांनीही, एआयमुळे येत्या पाच ते दहा वर्षांत मानवी अस्तित्वालाच धोका निर्माण होऊ शकतो, याला दुजोरा देण्यास सुरुवात केली. यावर कडी म्हणजे, खुद्द या कंपन्यांच्या मुख्याधिकाऱ्यांनीही तशी शक्यता नाकारण्याऐवजी, एआय तंत्रज्ञान विकासाची गती धीमी करण्याची गरज व्यक्त केली.

एआयच्या विकासाचा पुढचा टप्पा आता आधी 'एजीआय'च्या आणि त्यानंतर 'एएसआय'च्या रूपात अपेक्षित आहे. 'एजीआय' म्हणजे आर्टिफिशिअल जनरल इंटेलिजन्स, ज्याच्या विकसनातील सुरुवातीचा टप्पा एआय कंपन्या सहा महिने ते एक वर्षांतच गाठतील, असा अंदाज आहे. मानवी आकलनक्षमता गाठणारा हा टप्पा असेल. 'एएसआय' म्हणजे आर्टिफिशिअल सुपर इंटेलिजन्स. त्यात सर्व मानवी मेंदूंच्या एकत्रित बौद्धिक क्षमतेपेक्षाही अधिक बुद्धिमान, सर्जनशील आणि सामाजिक कौशल्ये असणारी यंत्रे उपलब्ध होतील. हे कधीपर्यंत साध्य होईल, याचा मात्र अंदाज वर्तवणे शक्य झालेले नाही. हे पुढील टप्पे मानवी अस्तित्वाच्या मुळावर उठतील अशी भीती वाटण्याचे कारण काय, हे मात्र कोडे आहे. त्यासंदर्भाने नव्या तंत्रज्ञानविकासाच्या स्वाभाविक संभाव्य परिणामांकडे जसा अंगुलीनिर्देश केला जातो; तसेच एआय कंपन्यांतील स्पर्धेकडे आणि त्यातून त्यांना दिसू लागलेल्या व्यावसायिक संधींकडेही लक्ष वेधले जाते. नेमके काय घडत असावे, याचा अंदाज बांधण्यापूर्वी यासंदर्भातील एकेक पैलू समजून घ्यायला हवा.

**एआय विकासाच्या झपाट्यातील गुंते :** सुरुवातीच्या टप्प्यातील एआयचे स्वरूप निव्वळ विचारलेल्या प्रश्नावरील सांख्यिकीयदृष्ट्या सर्वाधिक शक्यता असणारी तर्कसंगती उलगडून दाखवणे एवढेच होते. गेल्या चार वर्षांत मात्र हा 'मेंदू' केवळ आपला मदतनीस (टूल) न राहता आपला पर्याय (एजंट) होण्याकडे वाटचाल करीत आहे. इतिहासकार व विज्ञानलेखक युवाल नोह हरारी यांनी तर एआयला मानवी संस्कृती, कायदे, वित्तव्यवस्था, संस्थाव्यवस्था यांची जाण आली आहे, हा धोक्याचा इशारा दिला आहे. एआयचा टूल ते एजंट हा प्रवास होईल, असे भाकित त्यांनी २०१६मध्येच केले होते!

**मानवी जीवनावरील परिणाम :** एआय वास्तववादी आशयनिर्मिती करीत आहे, माणसाच्या आवाजाची हुबेहूब नक्कल करीत आहे; माहितीच्या दुष्प्रचाराला त्याने प्रचंड व्याप्ती दिली आहे. संगणक प्रणाली विकास असो, माहितीचे पृथःकरण असो, की कोणतेही प्राथमिक टप्प्यावर केले जाणारे मानवी कार्य, त्याला यांत्रिक पर्याय त्याने उपलब्ध करून दिला आहे. दुसरीकडे, संगणकाच्या जाळ्यांमधील दोष दूर करण्याची जबाबदारी सोपवलेल्या एआय एजंटांनी प्रत्यक्षात संबंधित यंत्रणेवरच परस्पर सायबरहल्ले चढवल्याची उदाहरणे आपल्यासमोर आली आहेत. फेसबुकची मूळ कंपनी मेटाने याची जाहीर कबुलीही दिली आहे. संरूपणातील (कॉन्फिगरेशन) चुकीमुळे हे घडल्याचे कारण त्यामागे दिले आहे. भविष्यातील दिशा आणि कथित धोके : एआयला प्रशिक्षण कसे द्यायचे, हे आपण ठरवू शकतो; परंतु एआयमध्ये विकसित होणारी तर्कबुद्धी ही मानवी हेतूंनुसारच कार्यप्रवण होईल, याची शाश्वती देऊ शकत नाही. एआयचा विकास हा त्याच्याकडे केल्या जाणाऱ्या विचारणेला प्रतिसाद देण्यासाठी आणि त्याच्यावर सोपवलेली कामगिरी पार पाडण्यासाठी केला गेला आहे. त्यामुळे एखाद्या जोखमीच्या प्रसंगात उद्दिष्टपूर्तीला प्राधान्य देऊन हे तंत्रज्ञान फसवा किंवा चुकीचा प्रतिसाद देऊ शकते. जुलै २०२६मध्ये घडलेल्या एका प्रसंगात ओपन एआय या कंपनीच्या सातशे एजंटांनी हगिंग फेस या दुसऱ्या एका मंचावर परस्पर संगनमत करून सायबर हल्ला केला होता, हे याचे ठळक उदाहरण आहे. खरा धोका किती आणि कावेबाजी किती? : एआयच्या जोखमींविषयीची ओरड अवाजवी नाही, हे आता सर्वच जण मान्य करतात. मात्र, बड्या एआय कंपन्यांचे संस्थापक आणि मुख्य कार्याधिकारी जेव्हा एआयचा पुढील टप्प्यातील विकास काळजी घेत व्हायला हवा असे म्हणतात. त्याची जबाबदारी न घेता सरकारी यंत्रणांनी त्यासाठी नियमन करावे, असे सुचवतात, तेव्हा शंकेची पाल चुकचुकते. स्पर्धेत मागे राहू नये यासाठी स्वतःहून बंधने घालून घेण्यापेक्षा सर्वांसाठीच तशी चौकट आखली जावी, हा हेतू त्यामागे असू शकतो; परंतु अशा नियमनाच्या आडून नव्या स्पर्धकांची कोंडी करण्याचा डावही असू शकतो. अमेरिकेच्या ट्रम्प प्रशासनामध्ये अध्यक्षांच्या विज्ञान–तंत्रज्ञान सल्लागार समितीचे सहअध्यक्ष म्हणून काम पाहणारे डेव्हिड सॅक्स यांनी तशी शंका बोलूनही दाखवली आहे.

– श्याम ठाणेदार




जपानमधील आयची–नगोया येथे झालेल्या २०२६च्या आशियाई क्रीडा स्पर्धेने भारतीय क्रीडा क्षेत्राला नवा आत्मविश्वास दिला आहे. आशियातील सर्वोच्च बहुक्रीडा स्पर्धेत भारताने यंदा २१ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३७ कांस्य अशी एकूण ८५ पदके जिंकत पदकतालिकेत चौथे स्थान मिळवले. २०२२च्या हांगझोऊ स्पर्धेतील १०६ पदकांच्या विक्रमानंतर हा भारताचा दुसरा सर्वोत्तम पदकविजय आहे. विशेष म्हणजे यंदाचा भारतीय चमू मागील स्पर्धेपेक्षा तुलनेने लहान होता. त्यामुळे ८५ पदकांचे हे यश निश्चितच उल्लेखनीय आहे.

भारतीय खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारांत चमकदार कामगिरी केली. नेमबाजी, तिरंदाजी, बॉक्सिंग, कुस्ती, हॉकी, कबड्डी, ॲथलेटिक्स, क्रिकेट आणि गोल्फ या क्रीडा प्रकारांनी भारताच्या पदकतालिकेत महत्त्वाची भर घातली. नेमबाज नीरू धांडा हिने दोन सुवर्ण आणि एक रौप्य पदक मिळवत विशेष ठसा उमटवला. तिच्या कामगिरीमुळे भारताच्या महिला नेमबाजीला नवी ओळख मिळाली. तिरंदाजीत महिलांच्या रिकर्व्ह संघाने ऐतिहासिक कामगिरी केली, तर कुमकुम अनिल मोहोड हिने वैयक्तिक रिकर्व्हमध्ये भारतासाठी ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवले.

बॉक्सिंगमध्ये भारतीय खेळाडूंनी तीन सुवर्णपदके जिंकून आपली ताकद दाखवून दिली. लव्हलिना बोर्गोहेन हिनेही सुवर्णपदक जिंकून भारतीय महिला बॉक्सिंगच्या उज्ज्वल परंपरेला पुढे नेले. कुस्तीमध्येही भारताने महत्त्वाची पदके मिळवली. हॉकीमध्ये भारतीय पुरुष संघाने सुवर्णपदक कायम राखले, तर महिला संघाने तब्बल ४४ वर्षांनंतर आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. महिला हॉकी संघाच्या या विजयामुळे २०२८ लॉस एंजेलिस ऑलिंपिकचे थेट स्थानही निश्चित झाले.

या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे भारताच्या पदकांचा विस्तार अनेक क्रीडा प्रकारांत झाला आहे. एमएमए आणि सॉफ्ट टेनिससारख्या नव्या क्षेत्रांतही भारताने पदके जिंकली. गोल्फमध्ये भारतीय महिला खेळाडूने ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवले. यावरून भारतीय क्रीडा क्षेत्र आता केवळ क्रिकेट, हॉकी, कुस्ती किंवा नेमबाजीपुरते मर्यादित राहिलेले नाही, हे स्पष्ट होते.

मात्र या यशाबरोबर काही बाबींचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. हांगझोऊच्या तुलनेत यंदाची एकूण पदकसंख्या कमी आहे. काही पारंपरिक क्रीडा प्रकारांत भारताला अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे केवळ पदकसंख्येवर समाधान न मानता कुठल्या क्रीडा प्रकारांत आपण मागे पडलो, त्याची कारणे शोधून त्यावर दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक आहे.

ऑलिंपिकच्या तयारीसाठी महत्त्वाचा टप्पा

२०२६च्या आशियाई क्रीडा स्पर्धेचे सर्वांत मोठे महत्त्व म्हणजे २०२८च्या लॉस एंजेलिस ऑलिंपिकची तयारी. आशियातील बलाढ्य खेळाडूंशी स्पर्धा करताना मिळालेला अनुभव भारतीय खेळाडूंना ऑलिंपिकमध्ये निश्चितच उपयोगी ठरणार आहे. कोणत्या क्षेत्रात सुधारणा आवश्यक आहे, कोणत्या खेळाडूंची क्षमता पदक जिंकण्याची आहे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर दबावाच्या परिस्थितीत कामगिरी कशी उंचावता येते, याचा मौल्यवान अनुभव या स्पर्धेतून मिळाला आहे.

आता पुढील दोन वर्षे भारतीय क्रीडा व्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण, आधुनिक क्रीडा विज्ञान, आहारतज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ, अत्याधुनिक उपकरणे, दुखापतींवर योग्य उपचार आणि सातत्यपूर्ण आंतरराष्ट्रीय स्पर्धांचा अनुभव मिळणे आवश्यक आहे. पदकविजेत्यांबरोबरच पदकापासून थोडक्यात दूर राहिलेल्या खेळाडूंवरही विशेष लक्ष दिले पाहिजे.

भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी आशादायी भविष्य

आयची–नगोया येथील कामगिरी ही केवळ ८५ पदकांची आकडेवारी नाही; ती भारतीय क्रीडा क्षेत्रातील बदलाची नांदी आहे. ग्रामीण आणि छोट्या शहरांमधूनही प्रतिभावान खेळाडू पुढे येत आहेत. महिलांचा सहभाग आणि यश वाढत आहे. त्यामुळे शाळा, महाविद्यालये, जिल्हा आणि राज्य पातळीवर क्रीडा सुविधा वाढवणे, प्रशिक्षकांची गुणवत्ता सुधारणे आणि आर्थिक मदत वेळेवर उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

आशियाई स्पर्धेतील यशामुळे नव्या पिढीला खेळाकडे करिअर म्हणून पाहण्याची प्रेरणा मिळेल. पालकांचा दृष्टिकोन बदलेल आणि विविध खेळांमध्ये सहभागी होणाऱ्या मुला–मुलींची संख्या वाढेल. 'खेळा आणि जिंका'पासून 'खेळा, घडवा आणि देशासाठी पदक जिंका' या दिशेने भारतीय क्रीडा क्षेत्राची वाटचाल होणे आवश्यक आहे.

आयची–नगोया स्पर्धेने भारताला अभिमानाचे ८५ पदके दिली आहेत; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे तिने ऑलिंपिकच्या स्वप्नासाठी नवी ऊर्जा दिली आहे. या यशाचा योग्य आढावा घेऊन नियोजनबद्ध प्रशिक्षण, पायाभूत सुविधा आणि खेळाडू–केंद्रित धोरण राबवले, तर २०२८च्या लॉस एंजेलिस ऑलिंपिकमध्ये भारताची पदकसंख्या आणखी वाढू शकते. आजची ८५ पदकांची कामगिरी उद्याच्या ऑलिंपिक पदकांची मजबूत पायाभरणी ठरावी, हीच अपेक्षा!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# माझ्याकडे आनंद आहे!

'हळूच या हो हळूच या' ही कुसुमाग्रजांनी लिहिलेली बालकविता. नितांत सुंदर. कवितेतील एक एक शब्द म्हणजे नक्षत्रच जणू. कवितेतील प्रत्येक शब्दाची जादूच न्यारी. कोणताही अलंकार नाही, उपमा नाही. देवाच्या मूर्ती सारखी अगदी साधी. तरीही प्रत्येक ओळ मनाला भिडणारी. फुलांसारखंच आपलंही आयुष्य असावं अस सांगणारी. फुलांच्या जगाचे वेगळेच रूप दाखवणारी. दुसरीच्या मराठीच्या पुस्तकात ही कविता मुलांना अभ्यासासाठी आहे. सोन्याहून सुंदर असलेली कविता (बाईंनी) आताच्या मॅडम नी मुलांना अशी शिकवली की फुलांपेक्षाही कोमल भावना मुलांच्या मनात जन्माला आली. अनेक विचारवंतांना जे विचार पेरायला शेकडो वर्षे लागतात ते विचार क्षणात मॅडमनी मुलांच्या मनात पेरले. मॅडमनी कविता कशी शिकवली व पुढे काय झाले हे ऐकताना देहभान हरपून गेले. मॅडमचा प्रत्येक शब्द फुलांचे विश्व मुलांशी जोडत होता त्याच क्षणाला माझ्या मनात विचारांचा सेतू भावनांचे बांध जोडत होता. '
'हसुनी डोलूनी देतो उधळूनी ,
सुगंध या तो सेवाया' या ओळीने मनाचा ठाव घेतला. सुगंध हे फुलांचे सर्वस्व पण आपले सर्वस्व फुलं इतरांसाठी उधळून देतात. अगदी हसत हसत कायम. कवितेचा शेवट 'निर्मल सुंदर अमुचे अंतर या आम्हाला भेटाया' या ओळीने होतो. फुलांच्या मनातील भावनांचे हे अनोखे तरंग जीवनात कधीही न पाहिलेले भावनांचे रंग आपल्याला दाखवतात आणि माणूस म्हणून मला अजून खूप काही करायचंय हे शिकवून जातात.

दुसरीचा वर्ग. मराठीचा तास सुरु होता. मॅडम नी 'हळूच या हो हळूच या, ही कविता शिकवायला सुरुवात केली. लहान मुलांना कविता शिकवायची म्हणजे फक्त सूर, ताल, लय यांचा संगम साधायचा या विचाराला छेद देऊन मुलांचे व्यक्तिमत्व घडवणारे संस्कार कसे करता येतील असा विचार करून मॅडमचे शिकवणे सुरू होते. अर्थाचे स्पष्टीकरण, वाक्याचा अर्थ आणि सोबतीला नृत्य यांचा योग्य समतोल साधला होता. कधी हसत–खेळत, तर कधी गंभीर, तर कधीमज्जा किर्तन रंगात यावं आणि भाविकांनी स्वतःला विसरून भगवंताचे नामस्मरण करावे तसंच मुलांचं झालं होतं. आपणही जणू फुलं आहोत असाच भाव मुलांच्यात दिसत होता. 'हृदये अमुची इवलीशी, परि गंधाच्या मधि राशी!' ही ओळ गाताना मुलांच्या चेहऱ्यावर मधाचा गोडवा दिसत होता.

मॅडम नी फुलांचे सर्व गुण मुलांना सांगितले. आपण फुलांना कसं जपायला हवं तेही सांगितलं. मुलांकडून कविता म्हणून घेतली. वर्गातलं वातावरण अगदी चैतन्यमय झालं होतं. हसऱ्या चैतन्याची भरतीच वर्गात आली होती. कविता शिकवून झाली. आता स्वाध्यायाची चर्चा सुरू झाली. मॅडम नी मुलांना एक प्रश्न विचारला, इतरांना देण्यासारखी कोणती गोष्ट तुझ्या जवळ आहे? मॅडम ना वाटलं होतं की मुलं सांगतील, माझ्याकडे चॉकलेट आहे, माझ्याकडे खाऊ आहे, माझ्याकडे पुस्तक आहे... मुलांची चर्चा सुरु झाली. मॅडम मुलांच्या प्रतिसादाची वाट बघू लागल्या. इतक्यात आर्वी उभी राहिली आणि तिने सांगितले, इतरांना देण्यासाठी माझ्याकडे आनंद आहे. सात वर्षे वयाच्या मुलीने दिलेले हे उत्तर मॅडम साठी अनपेक्षित होते. क्षणभर विचार करून मॅडम नी आर्वीला पुन्हा विचारले, तू मला आनंद कसा देशील? कारण देणे घेणे या गोष्टी शक्यतो वस्तूच्या रुपात असतात एवढी समज या वयातल्या मुलांची असावी असा मॅडमचा समज होता. क्षणाचाही विलंब न करता आर्वी म्हणाली, मी तुमच्याशी चांगलं वागेन, तुम्हाला माझ्यामुळे त्रास होणार नाही अस मी वागेन. इतरांना आनंद कसा द्यावा हा विचार दुसरीतल्या मुलीने सांगितला. वस्तूच्या रूपात खोटा आनंद शोधणारी माणसं कुठे आणि भावनांच्या रूपात आनंद वाटणारी फुलांसारखी मुलं कुठे !

इतरांना देण्यासाठी माझ्याकडे फक्त आनंदच आहे, तो मी माझ्या वागण्यातून, बोलण्यातून माझ्या हसण्यातून देऊ शकते हे आर्वीने शिकवले. पण आर्वीच्या शिकण्याचे मूळ शिक्षकाच्या शिकवण्याच्या पद्धतीत आहे. दुसरीतील मुलं वयाने लहान असली तरी जीवनाचा अर्थ त्यांच्या शब्दात फुलांच्या माध्यमातून अगदी हळूच मॅडम नी मुलांच्या मनात पेरला. म्हणून फुलांप्रमाणेच निरागसपणे आर्वी जगाच्या कल्याणासाठी आनंद वाटायला तयार झाली. हे सगळं जग बदलून नव्हे तर जगासाठी स्वतःला बदलून. इतरांना त्रास होईल असे मी कधी वागणार नाही हे फुलांसारखं सांगून.

काल शाळेत आर्वीभेटली. तिला तोच प्रश्न विचारला. तिने तेच उत्तर दिल. मृदू आवाज, बोलके डोळे आणि चेहऱ्यावर चैतन्य. कैवल्याची मूर्तीच जणू. वय वर्ष सात. आर्वीला जवळ घेतलं. दुसरीचे पुस्तक उघडलं. 'हळूच या हो हळूच या, ही कविता मनातल्या मनात वाचली. पण कवितेत 'आनंद' हा शब्द दिसला नाही. तरीदेखील आर्वीने, इतरांना देण्यासाठी माझ्याकडे आनंद आहे, हे उत्तर का सांगितलं असावं? हा प्रश्न मी मॅडमना विचारला. मॅडम नी, 'हसुनी डोलूनी देतो उधळूनी,
सुगंध या तो सेवाया'
या ओळीवर बोट ठेवले. क्षणभर मॅडम नी आर्वीकडे पाहिले. त्याच क्षणाला मला शब्दांपलीकडचे विश्व दिसले. फुलांचं बोलणं मला नाही समजलं पण मॅडमनी मध्यस्थी केल्यामुळे आर्वीला ते समजलं. शिक्षकाच्या शिकवण्यामुळे एक मूल आनंद वाटायला निघाले आहे.

माझी नजर पुन्हा एकदा पुस्तकातील स्वाध्यायाकडे गेली. 'इतरांना देण्यासाठी तुझ्याकडे काय आहे'?

**सौ.अपराजिता कवितके (मॅडम)**
**गोळवलकर गुरुजी प्राथमिक विद्यालय**

## कवडसा

घनघोर या काळोखाला,
एकच कवडसा पुरेसा होता,
मी राख होतो ज्या दुःखात,
त्याला एक दिलासा होता.

मी पूर्ण सूर्य कधीच
मागितला नाही या आभाळाकडे,
तुझ्या एकाच किरणाचा,
मज वेड्याला ध्यास होता.

काठोकाठ भरून आले,
आज पुन्हा हे डोळे माझे,
तू निघून गेल्यावरही,
इथे तुझाच भास होता.

हृदयातून वाहतात अजून,
रक्ताचे अश्रू माझ्या,
तुझ्यासोबतचा तो प्रवास,
केवढा जीवघेणा होता.

सांग मी कसा विसरू तुला,
ती रात्र अन ती तुझी भेट?
तुझ्या प्रेमात जळण्याचा,
तो माझा शेवटचा सोहळा होता.

**– कीर्तिराज आगलावे, पुणे**

# सांगली आकाशवाणी केंद्राची ६३ वर्षांची 'गौरवशाली वाटचाल'

१२५१ किलोहर्टझवर हे आकाशवाणीचे सांगली केंद्र आहे अशी उदघोषणा करूनच विविध कार्यक्रमांची सुरुवात होते. आजच्या डिजिटल आणि विविध समाज माध्यमांच्या विश्वात आकाशवाणी सांगली केंद्र आजही डौलाने उभे आहे आज मनोरंजनाची, माहितीची साधने अनेक असली तरी आकाशवाणी सांगली केंद्रानेही काळानुरुप नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर आणि दर्जेदार कार्यक्रमांची मांडणी करुन श्रोत्यांना मेजवानी दिली आहे.

आकाशवाणी सांगली केंद्रावरुन सादर होणारे श्रोत्यांच्या मनपसंत हिंदी आणि मराठी गीतांचा आपली आवड, आपकी पसंत, शेतकऱ्यांसाठी माझं घर माझं शेतं, महिलांसाठी नारी विश्व, बातम्या, असे एकापेक्षा एक दर्जेदार, कर्णमधूर कार्यक्रम प्रसारीत करुन सांगली आकाशवाणीने श्रोत्यांच्या मनात घर केले आहे.

आकाशवाणी सांगली केंद्र हे महाराष्ट्रातील सांगली आणि कोल्हापूर परिसरातील श्रोतांसाठी बातम्या, कृषी माहिती आणि मनोरंजनाचे कार्यक्रम प्रसारित करणारे महत्त्वाचे केंद्र आहे बहुजन हिताय, बहुजन सुखाय हे ब्रीद वाक्य घेऊन आकाशवाणी सांगली केंद्राची स्थापना ६ ऑक्टोंबर १९६३ रोजी झाली त्यामुळे सांगली आकाशवाणी मंगळवार दि.०६ रोजी ६३ वा. वर्धापन दिन साजरा करत आहे. पूर्वीच्या काळात मनोरंजनाचे आणि माहितीचे साधन म्हणून रेडिओकडे पाहिले जायचे त्यामुळे आकाशवाणी प्रभावी माध्यम होते. आकाशवाणी सांगलीला चित्रा हंचनाळकर, नीता गद्रे, वामन काळे, दत्ता सरदेशमुख यासारखे सरस निवेदक लाभले होते ६३ वर्षे पूर्ण होतं असताना हा इतिहास केवळ भूतकाळचं नाही तर समृद्ध परंपरेचा एक अभिमानास्पद भाग आहे.

या केंद्राने दिलेले व्यासपीठ साहित्य संगीत क्षेत्रातील योगदान आणि समाजाभिमुख कार्य आजही प्रेरणादायी ठरते आकाशवाणीचा हा सुवर्णकाळ मराठी संस्कृतीचा अमूल्य ठेवा बनून पुढील पिढ्यांसाठी स्मरणीय ठरतो आहे.

**– राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

## दुचाकी घसरून तरुणाचा मृत्यू; जिंतूर तालुक्यातील घटना



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.०५, जिंतूर :** जिंतूर-जालना मार्गावरील मालेगाव-खडकपाटी परिसरात दुचाकी घसरून झालेल्या अपघातात ३५ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (दि.५ ऑक्टोबर) दुपारी सव्वाएक वाजण्याच्या सुमारास घडली. ज्ञानेश्वर दत्तात्रय बुधवत (वय ३५, रा. जांब बुद्रुक) असे मृत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ज्ञानेश्वर बुधवत हे दुचाकीवरून मालेगाव-खडकपाटी मार्गाने जात असताना रस्त्यावर सुरू असलेल्या डांबरीकरणाच्या कामाच्या ठिकाणी त्यांची दुचाकी अचानक घसरली. रस्त्यावर खडी व डांबर टाकण्यात आले असल्याने दुचाकीचा ताबा सुटून ते रस्त्यावर जोरात पडले. या अपघातात त्यांच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाली.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक सचिन आडे, सामाजिक कार्यकर्ते नागेश आकात आणि रुग्णवाहिका चालक संतोष जाधव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेतील ज्ञानेश्वर यांना त्वरित जिंतूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलसुम खाजा यांनी तपासणी केल्यानंतर त्यांना मृत घोषित केले.

दरम्यान, रस्त्यावरील सुरू असलेल्या डांबरीकरणाच्या कामामुळेच हा अपघात घडल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. काम सुरू असताना वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी योग्य त्या सूचना, दिशादर्शक फलक तसेच आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

या दुर्दैवी घटनेमुळे जांब बुद्रुक परिसरात हळहळ व्यक्त होत असून बुधवत कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. संबंधित रस्ते कामाची पाहणी करून अपघातास कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीची चौकशी करावी, अशी मागणीही होत आहे.

## कु, तंजीलाची BAMS, व बंधू कामरान शेख याची BHMS २०२६ Cap Round १ मध्ये निवड



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०५, सुपा :** आहिल्यानगर जिल्ह्यातील केडगाव येथील सिकंदर शेख यांचे दोन्ही मुलांनी जिल्हा परिषद शाळा केडगाव येथील शिक्षणास सुरुवात करून जिद्द आणि चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर आज कु.तंजीला ही BAMS आणि तिचा बंधू कामरान शेख हा BHMS कोर्ससाठी २०२६ कॅम्प राऊंड वन मध्ये निवड झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे केडगावमध्ये व रांजणगाव मशीद येते त्यांच्या निवडीचे स्वागत करण्यात आले आहे. त्यांच्या या शिक्षणासाठी व यशाचे खरे मानकरी त्यांचे शिक्षक गुरुवर्ग व त्यांचे मार्गदर्शक उद्योजक समीर आत्तार शाकीर आत्तार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. हे कुटुंबाचे मेडिकल क्षेत्रात पदार्पण झाल्याने त्यांचे सर्व क्षेत्रातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## खरपत बंधाऱ्यामुळे दुबार पिकांना दिलासा; तरीही खोट्या तक्रारींचा खेळ



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०५, शहापूर (ठाणे) :** खरपत बंधाऱ्यावरून वाद बंधाऱ्याचे काम उत्कृष्ट, सरकारी कर्मचारी यांना नाहक गोवण्याचा प्रयत्न; खरांगण खरपत येथील शेतकऱ्यांनी दिल्या प्रतिक्रिया

शहापूर तालुक्यातील मौजे खरपत येथे जलसंधारण विभागाने बांधलेला सिमेंट कॉंक्रीट बंधारा अत्यंत उत्कृष्ट दर्जाचा असून, यामुळे शेतकऱ्यांना दुबार पिकासाठी पाणी उपलब्ध झाले आहे. मात्र, या चांगल्या कामात खोडा घालण्यासाठी काहीजण नाहक खोट्या तक्रारी करत असल्याचा आरोप स्थानिक शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकरी यशवंत पांडुरंग हरड आणि इतर शेतकऱ्यांच्या प्रतिक्रियेनुसार, या बंधाऱ्यामुळे कोणाचेही नुकसान झालेले नसून, सरकारी कर्मचारी व इतरांना यात जाणीवपूर्वक गोवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. कोणत्या उद्देशाने ५ महिन्यांनंतर ही खोटी तक्रार केली जात असून, अधिकाऱ्यांनी यावर जाग्यावर जाऊन पाहणी सुद्धा केली, तरी यावर कोणीही विश्वास ठेवू नये. बंधाऱ्याचे काम उत्कृष्ट, शेतकऱ्यांना दुबार पिकाचा मोठा फायदा बंधाऱ्यामुळे कोणत्याही पिकाचे किंवा शेतीचे नुकसान नाही सरकारी बाबूआणि ग्रामस्थांना नाहक गोवण्याचा प्रयत्न तसेच कोणीही खोटी तक्रार करू नये, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे या बंधाऱ्यामुळे उन्हाळी काकडी , भेंडी चे पीक मोठ्या प्रमाणात घेऊ शकतो तसेच गुरांना पाणी मोठ्या प्रमाणात मिळू शकतो , एकीकडे महाराष्ट्रात २६५ तालुके दुष्काळग्रस्त जाहीर झाले असतानाही येथे मोठ्या प्रमाणात पाणी साठा असल्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहावयास मिळाले.

## ऐरोलीत सलग तीन दिवस अनधिकृत बांधकामांविरोधात धडक कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात अनधिकृत बांधकामांविरोधातील मोहीम सर्व विभाग कार्यालयांमार्फत तीव्र करण्यात आली असून, जी विभाग ऐरोली कार्यालयाच्या वतीने सलग तीन दिवस धडक तोडक कारवाई करण्यात आली. नोटीस बजावूनही अनधिकृत बांधकामे सुरू ठेवणाऱ्यांविरोधात ही कारवाई करण्यात आली.

२९ सप्टेंबरची कारवाई : काशिनाथ मतभिक यादव, एस. आर. वर्मा-विकासक तसेच काशिनाथ मतभिक यादव यांनी घर क्र. क-१०६, से-४, ऐरोली आणि घर क्र. क-१०७, से-४, ऐरोली, नवी मुंबई येथे अनधिकृत बांधकाम सुरू केले होते. या बांधकामांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये २१ जानेवारी २०२६ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. संबंधितांनी बांधकाम स्वतःहून हटविणे आवश्यक असतानाही ते सुरू ठेवल्याने २९ सप्टेंबर रोजी अंशतः निष्कासित करण्यात आले. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व अतिक्रमण उपआयुक्त संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ऐरोली विभागाचे सहायक आयुक्त तथा विभाग अधिकारी विशाल शितोळे यांच्या नियंत्रणाखाली ही कारवाई करण्यात आली. यावेळी जी-विभाग कार्यालयातील अतिक्रमण विभागाचे अधिकारी व कर्मचारी, १४ मजूर, ४ ब्रेकर, ४ घण, २ जनरेटर तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलीस तैनात होते.

## विंचूर-लासलगाव रस्त्याचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करा; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०५, विंचूर (नाशिक) :** विंचूर ते लासलगाव या अत्यंत वर्दळीच्या रस्त्यावर सुरू असलेले कॉंक्रेट रस्त्याचे काम अचानक बंद पडल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसह स्थानिक नागरिक आणि व्यावसायिकांचे प्रचंड हाल होत आहेत. रस्त्यावर पडलेले मोठे खड्डे आणि वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे उडणाऱ्या धुळीच्या लोटांमुळे हा रस्ता प्रवाशांसाठी अक्षरशः डोकेदुखी ठरत आहे. प्रशासनाने तात्काळ हे काम सुरू करून मार्गी न लावल्यास राज्याचे मंत्री छगनराव भुजबळ यांच्याकडे दाद मागून रस्त्यावर उतरत तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

विंचूर-लासलगाव मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणावर वाहनांची ये-जा सुरू असते. मात्र, सध्या रस्त्याचे काम अर्धवट स्थितीत बंद असल्याने रस्त्यावर सर्वत्र बारीक माती व खडी पसरली आहे. वाहने वेगाने जाताच परिसरात प्रचंड धूळ उडते. या धुळीमुळे दुचाकी चालवणे अत्यंत जिकिरीचे झाले असून, समोरचे दृश्य स्पष्ट न दिसल्याने छोट्या-मोठ्या अपघातांचे प्रमाण वाढले आहे. अनेक वाहनचालकांना श्वसनाचा त्रासही सहन करावा लागत आहे.

**दुकानदारांचे व्यवसाय ठप्प, स्मशानभूमीत जाणेही कठीण**

रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या व्यावसायिकांना उडणाऱ्या धुळीमुळे आपली दुकाने उघडी ठेवणे अशक्य झाले आहे. दुकानांमध्ये मालावर सतत धूळ साचत असून ग्राहक येण्यास धजावत नसल्याने व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. त्यातच या रस्त्यालगत असलेल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी जाणाऱ्या नागरिकांनाही प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. रस्त्यावरील खड्डे व धुळीच्या साम्राज्यामुळे अंत्ययात्रेसाठी वाहने नेणे अथवा ती पार्क करणे अत्यंत अडचणीचे बनले आहे.

**काम कधी पूर्ण होणार? नागरिकांचा थेट सवाल...**



शासनाने हे सुरू असलेले काम नेमके कोणत्या कारणास्तव बंद केले आहे आणि ते पुन्हा कधी सुरू करून कधीपर्यंत पूर्ण केले जाईल, असा रोखठोक सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. प्रशासनाने सर्वसामान्यांची ही व्यथा वेळीच समजून घेऊन रस्त्याचे काम युद्धपातळीवर सुरू करावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

शासनाने या समस्येची तात्काळ गंभीर दखल घेतली नाही, तर लवकरच ना. छगनराव भुजबळ यांना लेखी निवेदन देऊन प्रशासनाचा निषेध नोंदवला जाईल व पुढील काळात तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा स्थानिक ग्रामस्थांनी दिला आहे.

यावेळी गोकुळ काळे, प्रशांत नवले, आनंदा शेवाळे, शंकर दिघे, सुशांत गायकवाड, सचिन वालेकर, रवी शेवाळे, संतोष भाऊ काळे, सुशांत फापाळे, हितेश देवासी, दिलीप कानडे, कृष्णा गायकवाड, सचिन गायकवाड, भगवान चव्हाण, ओम शेवाळे, सुधाकर दरेकर, जयदीप दरेकर, महेश शेवाळे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## यवत परिसरात ४१ किलोग्रॅम वजनाचा गांजासह, स्विस्ट कार असा एकुण २१ लाख रु. किं.चा मुद्देमाल हस्तगत

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.०५, यवत (पुणे) :** स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यवत परिसरात गस्त करत असताना यवत पोलीस स्टेशन हद्दीत अंमली पदार्थाची बेकायदेशीर रित्या देवाण-घेवाण होणार असून खात्रीशीर माहिती काढून कायदेशीर कारवाई करावी,असे आदेश मा. पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल सो. पुणे ग्रामीण, यांनी पथकाला दिले होते.

स्था.गु.शा.चे पथकाने पोनि प्रमोद क्षीरसागर यांचे मार्गदर्शनाखाली माहिती काढत असताना पोसई ज्ञानेश्वर राऊत,नेम. स्था.गु.शा.यांना त्यांचे गोपनीय बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, १)हर्षवर्धन अशोक बरडे वय २९वर्षे सध्या रा.काळेपडळ, हडपसर,ता. हवेली जि.पुणे मुळ रा. रायगाव ता.करमाळा जि. सोलापूर, २) कुशाल दत्तात्रय बिनवडे वय ३०वर्षे सध्या रा.काळेपडळ, हडपसर, ता. हवेली जि.पुणे मुळ रा. वंजारवाडी ता.करमाळा जि. सोलापूर हे दोघे त्यांच्या कडे असणाऱ्या प्रतिबंधीत गांजा अंमली पदार्थ एका पाढरे रंगाच्या स्विप्ट कार नं चक १२ थद६५०५ या कार मध्ये विक्री करणेसाठी घेवुन जात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली, त्या माहितीचे अनुषंगाने पथकाने कायदेशीर तरतुदींची पुर्तता करत उपविभागीय पोलीस अधिकारी दौंड उपविभाग दौंड यांचे आदेश प्राप्त झाल्यानंतर छापा कारवाईचे सर्व साहीत्य व पंचांसह स्था.गु.शाखेचे पथक व यवत पोलीस स्टेशन कडील पथक कारवाई साठी



रवाना झाले. मिळालेल्या बातमीचे ठिकाणी पथकाने जावून छापा कारवाई केली. कारवाई दरम्यान आरोपी १) हर्षवर्धन अशोक बरडे वय २९ वर्षे सध्या रा. काळेपडळ, हडपसर, ता. हवेली जि.पुणे मुळ रा. रायगाव ता. करमाळा जि. सोलापूर, २) कुशाल दत्तात्रय बिनवडे वय ३० वर्षे सध्या रा. काळेपडळ, हडपसर, ता. हवेली जि.पुणे मुळ रा. वंजारवाडी ता. करमाळा जि. सोलापूर यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांचे ताब्यात ४१ किलोग्रॅम वजनाचा गांजा अंमली पदार्थ, रंगाच्या स्विप्ट कार नं MH 12 WX 6505 असा २१,००,०००/- रू.किं चा मुद्देमाल मिळून आला आहे. त्याबाबत यवत पोलीस स्टेशन गु.र.नं. १०११/२०२६ एनडीपीएस कायदा कलम ८ (क), २० (ब) (क) (ii), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच पोलीस अधीक्षक, संदीप सिंह गिल्ल, सो.पुणे ग्रामीण, यांनी सर्व नागरिक आणि पालकांना नम्र आवाहन केले की, आपल्या जिल्ह्यातील युवा पिढीला अमली पदार्थांच्या प्राणघातक व्यसनापासून वाचवण्यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध आहे. हे अवैध जाळे मुळापासून उखडून टाकण्यासाठी प्रत्येक नागरिकाची सतर्कता आणि सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. आपल्या परिसरात अमली पदार्थांची विक्री किंवा वाहतूक करणाऱ्या गुन्हेगारांची माहिती देऊन कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत करा. माहिती देणाऱ्या नागरिकाची ओळख पूर्णपणे गुप्त ठेवली जाईल. कोणतीही भीती न बाळगता निर्भयपणे पुढाकार घ्या. आपली एक गुप्त माहिती एखाद्या तरुणाचे भविष्य आणि एका कुटुंबाचे आरोग्य सुरक्षित करू शकते. चला, अमली पदार्थमुक्त आणि सुरक्षित समाज घडवण्यात आपले योगदान द्या.असे सर्व नागरिकांना आवाहन केले आहे.

**मार्गदर्शन :** पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, सो. पुणे ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार बारामती विभाग, उपविभागीय पोलीस अधिकारी बापुसाहेब धडस,दौंड उपविभाग

**कारवाई पथक :** स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षीक संतोष तासगावकर, सपोनि गाढवे, पोसई वागज, पोसई मित्तलवाड, स्था.गु.शा.चे पोसई ज्ञानेश्वर राऊत स्था.गु.शा.चे पोलीस अंमलदार सचिन घाडगे, आसिफ शोख, गुरुनाथ गायकवाड, सुभाष राऊत, विकास कापरे, यवत पो स्टे चे पोलीस अंमलदार पोहवा/मेघराज जगताप, पोकों/दिवार यांनी केली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास यवत पोलीस स्टेशन हे करत आहेत.

## ग्रामपंचायतीच्या ग्रंथालयाचा जन सुविधा योजनेचा प्रस्ताव सादर करा

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०५, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यातील आढे येथील ग्रामपंचायत कार्यालयात सहायक प्रशासक तथा ग्रामविकास अधिकारी राजश्री पाटील यांना लोकमान्य टिळक सार्वजनिक वाचनालय,आढे ता.शिरपूर चा ग्रंथपाल दक्षा गिरासे यांच्या वतीने नुकतेच निवेदन देण्यात आले.

सविस्तर निवेदन असे की,जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जन सुविधांसाठी विशेष अनुदान योजनेचा राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या दि.१६/०९/२०१० रोजीच्या शासन निर्णयामध्ये नवीन सुधारित जि.आर. कार्यान्वित करून त्यात जनसुविधा योजनेअंतर्गत कामांची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे.त्याकरिता राज्य शासनाच्या वतीने नुकताच जी.आर.पारीत करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार गावात शासनामान्य सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय असणाऱ्या गावातील ग्रामपंच्यातीचा सार्वजनिक ग्रंथालय



इमारत बांधकाम करण्यासाठी वरिष्ठ कार्यालयात प्रस्ताव आवश्यक ते कागदपत्रे जोडून लवकरात लवकर सादर करता येणार आहे.गावातील सार्वजनिक वाचनालयासाठी स्वतंत्र इमारत मिळाल्यास गावातील वाचक प्रेमी व पंचक्रोशीतील वाचक लोकांना चांगल्या प्रकारे सोई सुविधा व लाभ होईल.स्वतंत्र अभ्यासिका निर्माण करता येईल.याकरिता जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत विशेष निधीसाठी ग्रामपंचायत कार्यालय यांच्या कडून लवकरात लवकर प्रस्ताव सादर करण्याची मागणी लोकमान्य टिळक सार्वजनिक वाचनालय या संस्थेचा वतीने यांच्या वतीने करण्यात आली.

## महिलांच्या आरोग्यासाठी पनवेल मनपाद्वारे विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, पनवेल :** महानगरपालिकेच्या 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत महिला व बालकल्याण विभाग आणि वैद्यकीय आरोग्य विभागाच्या संयुक्त पुढाकाराने महिलांसाठी चारही प्रभागांमध्ये विशेष आरोग्य तपासणी व तज्ज्ञ मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन ७ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबर दरम्यान प्रभागनिहाय करण्यात येत आहे.

महापालिका कार्यक्षेत्रातील महिलांनी या आरोग्य शिबिरांचा लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे यांनी केले आहे.

या शिबिरांमध्ये सांधेदुखी, गुडघेदुखी, हात-पायांची सूज व मुंग्या येणे, नसांशी संबंधित त्रास तसेच मान, पाठ व कंबरदुखी अशा समस्यांवर मोफत तपासणी व तज्ज्ञ मार्गदर्शन मिळणार आहे. या शिबिरांमध्ये संधीवात (Rheumatology), मज्जासंस्था (Neurology) आणि फिजिओथेरपी (Physiotherapy) या विषयांतील तज्ज्ञ डॉक्टरांकडून महिलांची मोफत तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.महिलांना त्यांच्या परिसरातच तज्ज्ञ डॉक्टरांची आरोग्य सेवा मोफत उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. महिला व किशोरवयीन मुलींनी या शिबिरांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे यांनी केले आहे.

**शिबिरांचे वेळापत्रक :**

७ ऑक्टोबर – प्रभाग ड : लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय, दांडेकर हॉस्पिटल जवळ, पनवेल.

८ ऑक्टोबर – प्रभाग अ : काळभैरव सभागृह, कळंबोली.

९ ऑक्टोबर – प्रभाग क : प्रभाग समिती कार्यालय, कामोठे.

१० ऑक्टोबर – प्रभाग ब : ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, सेक्टर १५, खारघर.

वेळ : सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत.



अक्षराज



# सामाजिक कार्यकर्त्यांसाठी मानवी तस्करी प्रतिबंधाबाबत एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, मुंबई :** संकल्प संस्था, मुंबई स्माईल्स आणि सारथी सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नेहरू नगर, कुर्ला (पूर्व) येथील पंतवालावलकर माध्यमिक विद्यालयात मानवी तस्करी : कारणे, परिणाम, प्रतिबंध, सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका आणि समुपदेशन या विषयावर एकदिवसीय विशेष प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत ३५ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. कार्यशाळेचे आयोजन संकल्प संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विनोद हिवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई स्माईल्सचे संस्थापक जौमे सान्लोरेन्टे उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयन सविता हेंडवे आणि सुवर्णा सोरटे यांनी केले, तर मुंबई स्माईल्सचे समन्वयक विकास गायकवाड यांच्या सहकार्याने कार्यशाळेचे नियोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.



त्यानंतर प्रशिक्षणाचा उद्देश आणि मानवी तस्करीसारख्या गंभीर सामाजिक प्रश्नावर सामाजिक कार्यकर्त्यांनी अधिक सजग आणि सक्रियपणे काम करण्याची आवश्यकता स्पष्ट करण्यात आली.

कार्यशाळेत मानवी तस्करी म्हणजे काय, तिची कारणे व परिणाम, तस्करीचे विविध प्रकार, बालक व महिलांच्या तस्करीची जोखीम, प्रतिबंधात्मक उपाययोजना, संबंधित कायदेशीर तरतुदी, पीडित व्यक्तींशी संवेदनशीलतेने संवाद साधणे, प्राथमिक समुपदेशन, पीडितांना आवश्यक मदत उपलब्ध करून देणे, पुनर्वसन आणि समाजात पुनर्समावेशन आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

मानवी तस्करी प्रतिबंध, पीडित सहाय्य व पुनर्वसनामध्ये सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका या विषयावर विनोद हिवाळे यांनी मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्त्यांनी केवळ जनजागृतीपुरते मर्यादित न राहता पीडित व्यक्तींना योग्य शासकीय व कायदेशीर यंत्रणेशी जोडणे, समुपदेशन व पुनर्वसनासाठी सहकार्य करणे आणि समुदाय पातळीवर प्रतिबंधात्मक काम उभे करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

कार्यशाळे दरम्यान प्रशिक्षणार्थ्यांनी चर्चासत्रे, प्रश्नोत्तरे आणि अनुभव मंडणीमध्ये सक्रिय सहभाग घेतला. काही प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाबाबत आपले मनोगत व्यक्त केले आणि या विषयावर पुढे काम करण्याची तयारी दर्शविली. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणून सर्व प्रशिक्षणार्थ्यांकडून मानवी तस्करीविरोधी सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात आली. समाजात मानवी तस्करी विरोधात जनजागृती करणे, पीडित व्यक्तींच्या सन्मान व हक्कांचे संरक्षण करणे, संशयास्पद प्रकरणांची माहिती संबंधित यंत्रणेला देणे आणि सामाजिक कार्यकर्ता म्हणून जबाबदारीने कार्य करण्याचा संकल्प प्रशिक्षणार्थ्यांनी केला. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी सर्व ३५ प्रशिक्षणार्थींना सहभाग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. प्रशिक्षणार्थ्यांनी कार्यशाळेबाबत सकारात्मक अभिप्राय नोंदविला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुंबई स्माईल्स, सारथी सोशल फाउंडेशन, सर्व मार्गदर्शक, समन्वयक, संकल्प संस्थेचे सहकारी, स्वयंसेवक आणि प्रशिक्षणार्थी यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार प्रदर्शन करण्यात आले.

## थोडक्यात बातम्या

### पोटा गावच्या सपना खापरे यांना पी.एच.डी. पदवी प्रदान



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** सावनेर तालुक्यातील पोटा येथील रहिवासी सपना शांताराम खापरे यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पी.एच.डी.) ही संशोधन पदवी प्रदान करण्यात आली. वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्ही.आय.टी) येथे आयोजित दीक्षांत समारंभात त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली. व्हीआयटी भोपाळ विद्यापीठाच्या वतीने 'आरोग्यसेवा आणि स्मार्ट ग्रिड डेटाच्या सुरक्षित प्रसारणासाठी खेढ संरचनांची रचना व विश्लेषण' या विषयावरील संशोधनासाठी त्यांना पी.एच.डी. पदवी बहाल करण्यात आली. त्यांच्या संशोधनाचे मार्गदर्शक म्हणून डॉ.संतोष कुमार साहू यांनी काम पाहिले. या दीक्षांत समारंभाला ऑपरेशन सिंदूरचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे जनरल उपेंद्र द्विवेदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सपना खापरे यांनी आपल्या मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर उच्च शिक्षणातील सर्वोच्च स्तरावरील संशोधन पदवी संपादन करून पोटा गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे खापरे कुटुंबासह संपूर्ण पोटा गावाची मान उंचावली असून, गावातील युवा पिढीसाठी त्या प्रेरणास्थान ठरल्या आहेत. पोटा या छोट्याशा गावातून अनेक प्रतिभावंत, बुद्धिजीवी आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वे विविध क्षेत्रांत आपला ठसा उमटवत आहेत. त्यात डॉ. सपना शांताराम खापरे यांच्या या यशाची भर पडली असून, त्यांच्या यशाबद्दल समस्त पोटावासीयांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या पुढील शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील वाटचालीसाठी सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# ज्ञानदेव सुंबरे यांच्या विक्रमाची महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद

## वयाच्या पन्नाशीतही जिद्द कायम; मांडओहोळ धरणात सलग १४ किमी पोहण्याचा विक्रम

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा गावचे सुपुत्र व श्री हरेश्वर शिक्षण संस्था कर्जुलेहार्या संचलित पळशी येथील मलवीर माध्यमिक विद्यालयातील शिक्षक ज्ञानदेव सुंबरे यांची महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली आहे. मांडओहोळ धरणात पोहण्याच्या राज्यस्तरीय यशाचा विक्रम म्हणून महाराष्ट्र ग्रुप ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद घेतली आहे.

ज्ञानदेव सुंबरे यांनी मांडओहोळ धरणात सलग १४ किलोमीटर अखंड पोहण्याचा विक्रम मागील वर्षी दीपावलीच्या दिवशी केला, त्यांच्या विक्रमाची दखल महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद घेण्यात आली आहे. राज्य पातळीवरील एखाद्या क्षेत्रात उच्चांक करणाऱ्या संस्था व व्यक्तींची नावे नोंदविणारे बहुभाषिक आंतरराष्ट्रीय नियतकालिकाने सुंबरे यांच्या पराक्रमाची दखल घेतली असून, त्यांना विक्रमाचे प्रमाणपत्र व पदक पाठविले आहे.

वयाच्या पन्नाशीत उत्कृष्ट ॲथलेटिक्स, शारीरिक क्षमता, चिकाटी, जिद्द व गेल्या १५ वर्षातील सरावातील सातत्य, दररोजचा नियमित आहार तसेच गेली १५ वर्षे नियमित पोहण्याचा सराव, या जोरावर मांडओहोळ धरणाचे हे १४ किलोमीटर अंतर त्यांनी ५ तासात पोहून पूर्ण केले. मांडओहोळ धरणाच्या इतिहासात प्रथमच हा पोहण्याचा विक्रम करणारे ज्ञानदेव सुंबरे हे पहिले पारनेरकर ठरले आहेत. या पराक्रमाबद्दल त्यांचे अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.



### अन्ना मोड बस थांब्याची तोडफोड

#### सिमेंटचे पत्रे लंपास, प्रवाशांचे हाल; गोरगरिबांचे कैवारी अन्नाच्या कार्याला गालबोट




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ अवघ्या १० रुपयांत पोटभर जेवण देऊन हजारो गोरगरीब व भुकेल्यांची सेवा करणाऱ्या अन्नांच्या निःस्वार्थ सेवेचा गौरव म्हणून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (NHAI) महामार्ग क्र. २४७ वरील परिसरातील अन्नामोड चौकाला अधिकृत 'अन्ना मोड' असे नाव दिले आहे. शिवाय प्रवाशांच्या सोयीसाठी अन्नामोड नावाने एका बस थांब्याची उभारणीही करण्यात आली आहे.

मात्र, समाजसेवेच्या या पवित्र वारशाला समाजकंटकांनी गालबोट लावले असून, या बस थांब्याची तोडफोड करून मागील बाजूस लावलेले सिमेंटचे पत्रेच चोरट्यांनी लंपास केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.राष्ट्रीय महामार्गावरून प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य नागरिक, महिला, शालेय विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना ऊन पावसापासून संरक्षण मिळावे म्हणून प्राधिकरणाने हा थांबा उभारला होता. सुरक्षिततेसाठी थांब्याच्या पाठीमागे मजबूत सिमेंट पत्रे बसवण्यात आले होते.

मात्र, अज्ञात चोरट्यानी हे पत्रे चोरी करून नेल्याने आता अन्नामोड थांबा पूर्णपणे उघडा पडला आहे.परिणामी, प्रवाशांना उन्हापावसात उभे राहून एसटी व इतर वाहनांची वाट पाहावी लागत असून प्रचंड हाल सहन करावे लागत आहेत. एकीकडे अन्नांच्या गौरवार्थ उभारलेल्या जागेची ही दुर्दशा झाली असताना दुसरीकडे बस थांब्याच्या परिसरात समाजकंटक व व्यावसायिकांचे अतिक्रमण वाढले आहे.

थांब्याच्या मागील बाजूस चिकन विक्रीचे दुकान सुरू करण्यात आले असून, लगतच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवर अनधिकृत देशी दारूचे दुकान थाटण्यात आले आहे. त्यामुळे दिवस-रात्र या ठिकाणी तळीरामांची गर्दी असते याच असामाजिक तत्त्वांकडून बस थांब्याचे नुकसान करण्यात आल्याचा दाट संशय व्यक्त होत आहे.

या संतापजनक प्रकारामुळे स्थानिक नागरिक, प्रवासी आणि समाजसेवकांमध्ये तीव्र रोष पसरला आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि स्थानिक पोलीस प्रशासनाने या घटनेची तातडीने दखल घ्यावी, परिसरातील सीसीटीव्ही तपासून चोरांचा शोध घ्यावा, संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी व थांब्याची तात्काळ दुरुस्ती करून अनधिकृत दुकानांवर हातोडा चालवावा अशी एकमुखी मागणी परिसरातून केली जात आहे.

# पनवेल रेल्वे स्थानकाबाहेर रिक्षाचालकांचा मनमानी कारभार

## वाहतूक नियमांचे उल्लंघन, प्रवाशांची कारवाईची मागणी




**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०५, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल रेल्वे स्थानकाबाहेर काही रिक्षाचालकांकडून सुरू असलेल्या मनमानी कारभारामुळे प्रवासी आणि नागरिक त्रस्त झाले आहेत. वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन, मनमानी पद्धतीने रिक्षा उभ्या करणे, मीटरप्रमाणे भाडे न आकारणे तसेच प्रवाशांशी अरेरावीची वागणूक देणे अशा प्रकारांमुळे स्थानक परिसरातील शिस्त आणि वाहतूक व्यवस्था धोक्यात आली आहे.

स्थानकाबाहेरील मुख्य रस्ते आणि प्रवेशद्वाराजवळ अनेक रिक्षाचालक नियमबाह्य पद्धतीने रिक्षा उभ्या करत असल्याचे चित्र रोज पाहायला मिळते. त्यामुळे इतर वाहनांच्या वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. तसेच रेल्वे स्थानकात येणाऱ्या-जाणाऱ्या हजारो प्रवाशांना मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागते. गर्दीच्या वेळेत ही समस्या अधिक गंभीर बनत असून अपघाताची शक्यता ही वाढत आहे.

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, अनेक रिक्षाचालक मीटरप्रमाणे भाडे आकारण्याऐवजी स्वतःच्या मनमानीनुसार भाडे ठरवतात. अल्प अंतरासाठीही जादा भाड्याची मागणी केली जाते. काही प्रवाशांनी मीटरप्रमाणे भाडे घेण्याची विनंती केल्यास त्यांच्याशी वाद घालणे, उद्धटपणे बोलणे, अश्लील किंवा गलिच्छ भाषेचा वापर करणे तसेच शिवीगाळ करणे असे प्रकार घडत असल्याच्या तक्रारी आहेत. रिक्षा व्यवसायासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (RTO) विविध नियम व अटी लागू केल्या आहेत.

मात्र अनेक रिक्षाचालक हे नियम धाब्यावर बसवत असल्याचे दिसून येत आहे. काही चालकांकडे आवश्यक असलेले बॅज (Batch) नसल्याचेही निदर्शनास येत आहे. तसेच अनेक चालक शासनाने निर्धारित केलेला गणवेश परिधान करत नसल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, RTO आणि वाहतूक विभागाकडून अधूनमधून कारवाई केली जाते. मात्र या कारवाया केवळ तात्पुरत्या स्वरूपाच्या असल्याने परिस्थितीत फारसा बदल होत नाही. काही दिवस कारवाई झाल्यानंतर पुन्हा पूर्ववत मनमानी सुरू होते. त्यामुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांमध्ये कायद्याचा धाक निर्माण होईल अशा कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाईची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.पनवेल हे वेगाने विकसित होणारे शहर असून रेल्वे स्थानक परिसरातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. अशा परिस्थितीत वाहतूक शिस्त राखणे आणि प्रवाशांना सुरक्षित व सन्मानजनक सेवा मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांवर कठोर कारवाई करून स्थानक परिसरातील वाहतूक व्यवस्था सुधारावी, मीटरनुसार भाडे आकारणी सक्तीची करावी तसेच बॅज व गणवेश नसलेल्या चालकांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी प्रवासी आणि पनवेलकर नागरिकांकडून करण्यात येत आहे.

कारवाई तात्पुरती नव्हे, तर नियमांचा धाक निर्माण करणारी असावी,अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### शेडाशी जंगलात सापडला अनोळखी इसमाचा मृतदेह

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०५, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील पूर्व भागातील शेडाशी, ठाकूरवाडी परिसरातील जंगलात १३ जुलै २०२६ रोजी अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयोगटातील एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला. मृतदेह अत्यंत कुजलेल्या अवस्थेत असल्याने त्याची ओळख पटविणे कठीण झाले असून, अद्याप या मृत व्यक्तीची ओळख पटलेली नाही. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू क्र. ५६/२०२६, कलम १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता अन्वये नोंद करण्यात आली आहे.

मृत व्यक्तीचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असून उंची सुमारे ५ फूट ५ इंच आहे. बांधा मध्यम आहे. मृत व्यक्तीच्या अंगावर काळपट रंगाची ट्रॅक पँट असून डाव्या पायावर '२३' असे लिहिलेले आहे. तसेच अंगात काळपट रंगाचा हाफ शर्ट असून त्यावर आडव्या रेषांचे डिझाईन आहे.

सदर मृत व्यक्तीची ओळख पटविण्याच्या दृष्टीने पेण पोलीस ठाण्याच्या स्तरावर तसेच उपलब्ध नोंदींच्या आधारे सर्वत्र तपास व चौकशी करण्यात आली आहे. मात्र अद्याप मृत व्यक्तीबाबत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. तसेच मृत व्यक्तीजवळ कोणतेही ओळखपत्र किंवा ओळख पटविणारी कागदपत्रे मिळून आलेली नाहीत.त्यामुळे सदर व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास अथवा आपल्या परिचयातील किंवा नातेवाईकांपैकी कोणी व्यक्ती बेपत्ता असल्याचे आढळून आल्यास त्यांनी तात्काळ पेण पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पेण पोलिसांनी केले आहे.

# मोहर्ली वनपरिक्षेत्रात वाघाचा हल्ला; महिला ठार, ३२ वा बळी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील मोहर्ली वनपरिक्षेत्राअंतर्गत आगरझरी परिसरात वाघाच्या हल्ल्यात अका ६० वर्षीय वृध्द महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना ५ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारच्या सुमारास घडली. मंदाबाई सूर्यभान मंगाम (वय ६० वर्षे) रा. आगरझरी असे मृत महिलेचे नाव आहे. चालू वर्षातील मानव- वन्यजीव संघर्षातील हा ३२ वा मृत्यू ठरल्याने परिसरात प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्यै प्राप्त माहितीनुसार, मंदाबाई मंगाम या आगरझरी-२ बीटातील राखीव वन कक्ष क्रमांक १८७ लगत असलेल्या स्वत:च्या शेत सर्व्हे क्रमांक १०/४ मध्ये शेतीची कामे करत होत्या. यावेळी दबा धरुन बसलेल्या वाघाने त्यांच्यावर अचानक हल्ला करुन त्यांना जागीच ठार केले.

घटनेची बातमी मिळताच मोहर्लीचे वनपर्क्षेत्र अधिकारी संतोष थिपे, दुर्गापूर पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी शेगावकर आणि प्रादेशिक वनकर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाचा पंटनामा करुन मृतदेह उत्तरस्तरीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर येथे रवाना केला. घटनेनंतर प्रशासनाकडून मृत महिलेचे पती सूर्यभान लक्ष्मण मंगाम यांना घटनास्थळी ५० हजार रुपयांची सानुग्रह मदत प्रदान करण्यात आली.




वाघाच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी वनविभागाने संबंधित परिसरात कॅमेरा ट्रॅप लावले असून, वन कर्मचाऱ्यांकडून गावात सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे. गावकऱ्यांनी शेतात आणि जंगल परिसरात काम करताना विशेष खबरदारी बाळगावी, असे आवाहन वनविभागाने केले आहे. घटनेचा पुढील तपास मोहर्ली वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे करत आहेत.